**Sakal 11th June 2014**



# महिंद्र अॅडव्हेंचर रॅलीचा गुरुवारी 'फ्लॅग ऑफ'

## 'स्टार ऑफ नाशिक' ठरलेल्या गौरव गिलकडे लक्ष

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १० : विसा आयोजित महिंद्र अॅडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रला गुरुवारी (ता. १२) दुपारी चारला सिटी सेंटर मॉलच्या मुख्य प्रवेशद्वारापासून मान्यवरांच्या हस्ते झेंडा (फ्लॅग ऑफ) दाखवून सुरवात होत आहे.

या रॅलीत पहिली गाडी गतविजेता गौरव गिल याची असेल. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विजेता ठरलेला गौरव नाशिकमध्ये काय धमाल उडवून देतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या सिटी सेंटर मॉलमध्ये ठेवण्यात आलेल्या रॅली प्रीपेर्ड गाडीमुळे आबालवृद्धांची उत्कंठा वाढत आहे. त्याठिकाणी काही खेळ खेळले जात असून, या खेळात यशस्वी झाल्यास त्यांना 'फ्लॅग ऑफ' झाल्यानंतर रॅलीत सहभागी खेळाडूंच्या गाडीतून त्याच खेळाडूबरोबर फेरी मारण्याची, त्याचप्रमाणे छायाचित्र काढण्याची, सही घेण्याची संधी मिळेल. फ्लॅग ऑफ झाल्यावर सर्व कार या पाठोपाठ सिटी सेंटर मॉल, एबीबी सर्कल, विद्याप्रबोधिनी शाळा, कॉलेज रोड, विद्या विकास सर्कल, जुना गंगापूर नाका, जेहान सर्कल विद्याप्रबोधिनी शाळा, एबीबी सर्कल या मार्गावरून सिटी सेंटर मॉल येथे येतील.

या सर्व मार्गावरही गाड्यांचे छायाचित्र क्रीडारसिकांना काढता येईल. महिंद्र अॅडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रचा संपूर्ण कार्यक्रम आणि त्यातील सहभागी कारच्या पाहणीसाठी सर्व कार सिटी सेंटर मॉल येथे ठेवण्यात आल्या आहेत. या वेळी नामांकित गौरव गिल, अमित्रसिंग घोष, समीर थापर आणि नाशिकचे धिवर बंधूही क्रीडारसिकांना भेटतील. धिवर बंधू काय कामगिरी करतात, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. या रॅलीत सहभागी झालेली हर्षिता गौडा अठरा वर्षांची असून, ती हॉटेल मॅनेजमेंट शिकत आहे.

**Sakal 11th June 2014**

# ‘एफएमएससीआय’च्या नियम बदलाचा रॅलीला फटका

## राष्ट्रीय कार रॅलीच्या पहिल्याच फेरीत स्पर्धकांच्या संख्येत घट, परदेशी स्पर्धकांनीही फिरवली पाठ

**श्रीकृष्ण कुलकर्णी :**
सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १० : परदेशी स्पर्धकांना इंडियन रॅली चॅम्पियनशिप अर्थात, ‘आयआरसी’मध्ये भाग घेण्याची आणि विजेतेपदाला गवसणी घालण्याची संधी मिळावी यासाठी दी फेडरेशन ऑफ मोटार स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया (एफएमएससीआय)ने कार रॅलीच्या नियमांत काही बदल केले आहेत.

या बदलाचा फटका नाशिक येथे होत असलेल्या राष्ट्रीय कार रॅलीला बसला असून, रॅलीत नामांकित कारचालक सहभागी झालेले असले, तरी सहभागी स्पर्धकांची संख्या घटली आहे. ज्या परदेशी स्पर्धकांसाठी ‘एफएमएससीआय’ने आपल्या नियमांत बदल केला, त्या स्पर्धकांनीही रॅलीकडे पाठ फिरवली आहे.

कार रॅलीसारख्या चित्तथरारक क्रीडाप्रकाराची एक वेगळीच चलती आहे. वेगाने कार चालवत आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कसब आत्मसात केलेल्या या स्पर्धकांचा खेळ पाहण्यासाठी चॅम्पियनशिप रॅलीच्या सर्वच फेऱ्यांना क्रीडारसिकांकडून देशभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.

या रॅलीत जेवढे जास्त स्पर्धक सहभागी होतील तेवढी चुरस अधिक असते. हीच चुरस अधिक वाढविण्यासाठी ‘एफएमएससीआय’ने २०१४ च्या कार रॅलीच्या आपल्या नियमांत काही बदल केले आहेत. त्यात एवढे वर्ष इंडियन रॅली चॅम्पियनशिपमध्ये भाग घेऊ न शकणाऱ्या परदेशी स्पर्धकांना सहभागाची संधी आणि विजेतेपदासाठीचे गुण जिंकणे शक्य झाले आहे. त्यामुळेच इतके वर्ष फक्त ‘आयएनआरसी’ नावाने ओळखली जाणारी ही रॅली इंडियन रॅली चॅम्पियनशिप, आयआरसी, अशा नावाने ओळखली जाणार आहे. एफआयएच्या एशिया झोनमध्ये असलेल्या कोणत्याही देशातील खेळाडू हे गुण आणि विजेतेपद मिळवू शकतो. त्यामुळेच २०१४ चा राष्ट्रीय विजेता हा एखादा परदेशी खेळाडू असेल, असे सर्वांनाच वाटले होते. मात्र, परदेशी स्पर्धकांचा सहभाग नसल्याने हे फक्त आता स्वप्नच ठरले आहे. नियम बदलण्यामागे ‘एफएमएससीआय’चा उद्देश खरोखरच चांगला आहे. पण परदेशी स्पर्धकांकडून त्याला योग्य प्रतिसाद न मिळाल्याने दरवेळी तीस-पस्तीस असणारी स्पर्धकांची संख्या यंदा वीसच्या घरात आहे. ही रॅली आता नामांकित भारतीय कारचालकांमध्येच होत असल्याचे दिसते.




### ‘एफएमएससीआय’च्या नियमांत बदल

- परदेशी स्पर्धकांना इंडियन रॅली चॅम्पियनशिप, आयआरसीमध्ये सहभागी संधी
- कार रॅलीत यापूर्वी असणाऱ्या विविध ‘सीसी’ गटाचे ‘ओव्हरऑल ग्रुप’मध्ये रूपांतर
- परदेशी स्पर्धकाला गुणांबरोबरच विजेतेपद मिळविण्याचा मान
- रॅलीतील चुरस वाढविण्यासाठी स्थानिक संयोजकांना विविध उपक्रमांचे अधिकार
- प्रायोजक मिळण्याच्या दृष्टीने नियोजन
- ‘एफआयए’च्या एशिया झोनमध्ये असलेल्या कोणत्याही देशातील स्पर्धक गुण मिळवू शकतो

### करमजितसिंगची अनुपस्थिती



आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजविणारा आणि आपल्या चित्तथरारक कसरतींनी सर्वांचे लक्ष वेधणारा मलेशियाचा करमजितसिंग नाशिक येथे होत असलेल्या राष्ट्रीय कार रॅलीत सहभागी होणार असल्याची चर्चा होती. मात्र, करमजितसिंगची प्रवेशिका न आल्याने तो आता सहभागी होणार नाही, हे निश्चित झाले आहे. करमजितसिंग सहभागी झाला असता, तर भारतीय कारचालक करमजितसिगला कशी टक्कर देतात आणि तोदेखील विजेतेपदाचा दावेदार मानला जात होता. त्यामुळे परदेशी खेळाडूंच्या रूपाने नाशिककरांनाही त्याचा खेळ पाहण्याची संधी मिळाली असती. अशा स्पर्धांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू जोरदार सराव करत असतात. त्याच्या अनुपस्थितीने प्रेक्षक नक्कीच नाराज होणार असले तरी अन्य खेळाडूही तितकेच ताकदीचे असल्याने ते कसर भरून काढतील.

**Lokmat 11th June**

इंटरव्ह्यू ऑफ द डे

# मोटर स्पोर्ट्सचा वारसा जोपासण्याचा प्रयत्न



**अश्विन पंडित**

**'विसा'च्या इंडियन रॅली चॅम्पियनशीप या कार रेसिंग स्पर्धेला उद्या (दि.१२) पासून प्रारंभ होणार आहे. यानिमित्त संस्थेचे संस्थापकअध्यक्ष अश्विन पंडित यांच्याशी साधलेला संवाद...**

तुम्ही कला, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक क्षेत्रात काम करीत असाल तर तुमचा बायोडाटा फोटोसह 'लोकमत'च्या शहर कार्यालयात पाठवा...

**■ 'विसा' कार रॅली स्पर्धेची संकल्पना थोडक्यात सांगा?**

२००१ सालापासून विसा कार रॅलीच्या राष्ट्रीय फेरीचे पहिल्यांदा आयोजन केले गेले. मोटर रॅलीमधील राष्ट्रीय विजेता घडविण्यासाठी भारतात दरवर्षी पाच किंवा सहा फेऱ्या घेतल्या जातात. त्यामधील महाराष्ट्र राज्यातील ही एकमेव फेरी असते. परंतु संपूर्ण देशभरातून मोटर कार ड्रायव्हर सहभागी होतात. प्रत्येक राउंडमध्ये सहभागी होऊन विजेत्यांना गुणदान केले जाते. यानुसार अंतिम फेरीचे गुण धरून एकूण गुण ज्या स्पर्धकाचे सर्वाधिक असतील तो राष्ट्रीय विजेता घोषित केला जातो.

**■ महाराष्ट्रातील कार रॅलीचे वैशिष्ट कोणते?**

सहा राउंडपैकी महाराष्ट्रात होणारा राउंड हा देशातील एकमेव डांबरी रस्त्यांवरील राउंड आहे हे विसा महाराष्ट्र कार रॅलीचे आगळे वैशिष्ट आहे. यामुळे अतिवेगवान स्पर्धेचा राउंड म्हणून याकडे बघितले जाते तसेच सह्याद्रीच्या पर्वतरांगेतून घाटमार्गे पार पडणारी सदर स्पर्धा ही मोटर कार ड्राईव्हरसाठी अत्यंत आव्हानात्मक व थरार निर्माण करणारी असते. १९९८ साली मी स्वतः कार ड्राइव्हर म्हणून राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेतला आहे. तसेच नाशिकला मोटर स्पोर्ट्सचा वारसा हा पूर्वीपासून असून, तो जोपासण्याचे काम संस्थेच्या वतीने केले जात आहे.

**■ यावर्षी कोणते नावीन्यपूर्ण बदल करण्यात आले आहेत?**

स्पर्धेत उतरणाऱ्या सर्व गाड्यांची सर्व्हिस ही एकाच ठिकाणी केली जाते व त्या ठिकाणाला सर्व्हिस पार्क असे म्हटले जाते. देशभरातून प्रथमतः शहरातील सिटी सेंटर मॉल येथे हा पार्क आणण्यात आला आहे. यामुळे प्रेक्षकांना कार रेसिंगमधील गाडीचे नावीन्य तसेच चालकांशी संवाद साधण्याची संधी मोटर प्रेमींना उपलब्ध होणार आहे. दुरुस्तीचा कालावधी शुक्रवारी (दि.१३) रोजी दुपारपासूनच सुरुवात होईल.

**■ रॅलीचा राउंड कोठे व कधी पार पडणार आहे?**

रॅलीचा पहिला राउंड फाळके स्मारकात दुपारी तीन वाजता सुरू होईल. शनिवारी सकाळी ६ वाजता पहिली गाडी सिटी सेंटर मॉल येथून निघेल. भंडारदऱ्यासमोर माणेरे गावापासून दुसरा राउंड सुरू होऊन खिरविरे गावाला संपेल. सदर राउंड १४ किलोमीटरचा आहे. कोकणवाडी गावात सर्वांत मोठा राउंड किमान १७ किलोमीटरचा दुसरा राउंड पार पडेल आणि तिसरा राउंड देवगाव ते चांगवी गावाला संपतो हे सर्वांत लहान चरण आहे. हे तीन टप्पे पार पडल्यानंतर सहभागी सर्व गाड्या मॉलला दुपारी बारापर्यंत दुरुस्तीसाठी पुन्हा येतील. अर्ध्या तासाने पुन्हा वरील सर्व राउंड सुरू होतील व संध्याकाळी ६ वाजेला संपतील. रविवारी पुन्हा सकाळी ७ वाजता पुन्हा वरील मार्गावर कार रेसिंग थरार पहायला मिळेल. दुपारी २ वाजता हॉटेल द गेटवे येथे बक्षीस समारंभ होईल.

शब्दांकन : **अझहर शेख**

**Sakal 10th June**

# महिंद्र ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रसाठी वीस प्रवेशिका निश्चित

## राष्ट्रीय विजेता अमित्रजित घोष, गौरव गिल, संजय थापरचा समावेश; महाराष्ट्रातील पाच स्पर्धक

Mahindra ADVENTURE Presents RALLY OF MAHARASHTRA

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ९ : वेस्टर्न इंडिया स्पोर्टस् असोसिएशन(विसा)तर्फे व दी फेडरेशन ऑफ मोटार स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया (एफएमएससीआय) व एफआयएच्या मान्यतेने येत्या गुरुवार (ता. १२)पासून सुरू होत असलेल्या 'महिंद्र ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्र' या राष्ट्रीय कार रॅलीच्या पहिल्या फेरीसाठी वीस प्रवेशिका निश्चित झाल्या आहेत.



गौरव गिल



अमित्रजित घोष



समीर थापर

गेल्या वेळचा चॅम्पियन अमित्रजित घोष, एशिया पॅसिफिक रॅली चॅम्पियन गौरव गिल, समीर थापर हे आपल्या सहचालकांसह सहभागी होत आहेत. रॅलीत वीसपैकी महाराष्ट्रातील पाच स्पर्धकांचा सहभाग आहे.

सर्वोत्कृष्ट आणि यशस्वी आयोजन करणाऱ्या 'विसा'ला यंदा आयआरसी अर्थात इंडियन रॅली चॅम्पियनशिपच्या सहा फेऱ्यांपैकी पहिलीच फेरी घेण्याची संधी मिळाली आहे. चार दिवस चालणाऱ्या या रॅलीच्या संधीचे सोनं करण्यासाठी नाशिककर प्रयत्नशील आहेत. देशपातळीवरील २० प्रवेशिका निश्चित झाल्या आहेत. त्यात महाराष्ट्रातील शिरीष चंद्रन- निखिल पै (पुणे), बायराम गोदरेज- ए. जी. सोमय्या (पुणे), ऋषीकेश ठाकरसी- निनाद मिरजगावकर (मुंबई), अनिरुद्ध-रांगणेकर-अर्जुन मेहता (पुणे) आणि नाशिकचे पराग व आदित्य खिवर हे बंधू अशा पाच प्रवेशिका आहेत. भंडादऱ्याच्या अवघड घाटात ही रॅली होत असून, महाराष्ट्रातील सर्वांत उंच

पान २ वर ▶

### दोन महिला स्पर्धकांचा सहभाग

बेंगळुरू आणि चिकमंगळूर येथे यापूर्वी झालेल्या राष्ट्रीय कार रॅलीच्या फेरीत सहभागी होऊन सर्वोत्कृष्ट कामगिरी करत लक्ष वेधणाऱ्या हर्षिता गौडा ही सहचालक आर. प्रशांतबरोबर आपल्या मारुती बलेनो या कारद्वारे सहभागी होत आहे. बेंगळुरू, चिकमंगळूर येथील रॅली ही 'डर्ट ट्रॅक' असल्याने तिने यश नोंदवले होते, पण नाशिकची रॅली ही 'टारमॅक' वर्गातील असल्याने हर्षितासाठी कार चालविण्याचा एक वेगळा अनुभव आणि सत्त्वपरीक्षा देणारी ठरेल, यात शंका नाही. अवतार गरिमा आणि सुखबन्स मान या महिला स्पर्धकांचा संघही 'व्हीडब्लू पोलो' या आपल्या कारने पहिल्यांदाच सहभागी होत आहे.



# वीस प्रवेशिका निश्चित

▶ पान १ वरून

कळसूबाईचे शिखर हे रॅलीच्या तिन्ही चरणात दृष्टीस पडणार आहे. येत्या गुरुवारी (ता. १२) सायंकाळी पोलिस आयुक्त कुलवंतकुमार सरंगल, श्रीरंग सारडा यांच्या उपस्थितीत औपचारिक उद्घाटन होईल. शुक्रवारी नाशिककरांसाठी अडीच किलोमीटरच्या विशेष फेरीचे दादासाहेब फाळके स्मारकाच्या परिसरात आयोजन करण्यात आले आहे.

### गौरव, अमित्रजित, समीरमध्ये चुरस

शनिवार आणि रविवार हा मोटार स्पोर्टस्प्रेमींसाठी विशेष आकर्षणाचा दिवस असणार आहे. या दोन दिवसांत कार रॅलीचा खरा थरार अनुभवण्याची संधी मिळणार आहे. भंडादऱ्याजवळ आता रॅलीच्या चरणासाठी नाशिकहून जाताना पहाटे लवकरच निघावे लागणार आहे. त्यानंतर इतर वाहनांसाठी हा मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे इतर वाहनांना तेथे प्रवेश नसेल. या रॅलीसाठी राष्ट्रीय विजेता अमित्रजित घोष, समीर थापर, गौरव गिल, सनी सिद्धू या कारचालकांत विजेतेपदासाठी खरी चुरस असेल. आपला नियमित सराव आणि अनुभवाच्या जोरावर रॅलीत कोण बाजी मारणार, हे त्यांचा वेग आणि कसब यावर अवलंबून असणार आहे.

### सिटी सेंटर मॉलमध्ये सर्व्हिस पार्क

या रॅलीत महिंद्र एक्सयूव्ही, व्हीडब्लू पोलो, मित्सुबिशी सिडिया, ईव्हीओ टेन, होंडा सिटी व्हीटीइसी, मारुती बलेनो यांसारख्या अद्ययावत गाड्यांवर कारचालक सहभागी होणार आहेत. त्यांच्या अद्ययावत तंत्रज्ञानाच्या गाड्या पाहण्याची संधी नाशिककरांना मिळावी यासाठी सर्व्हिस पार्क सिटी सेंटर मॉलच्या पहिल्या मजल्यावर ठेवण्यात आला असून, अशा प्रकारे सर्व्हिस पार्क शहराच्या मध्यवस्तीत ठेवण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. सध्या रॅलीसाठी पूर्ण तयार असलेली कार सिटी सेंटर मॉलच्या मुख्य मंडपात ठेवण्यात आली असून, ती नाशिककरांचे लक्ष वेधत आहे.

**Lokmat Times 9th June**

# Mahindra Adventure Rally gets 20 entries

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, JUNE 8

As many as 20 entries came for the participation in Mahindra Adventure Rally of Maharashtra. The closing date for entries was June 5.

The silver lining to the motorsports scene in Maharashtra is there are five entries from Maharashtra in Mahindra Adventure Rally of Maharashtra. One is from Western Indian Sports Association's own city, Nashik. A cousin duo, Parag and Aditya Dhiwar, has entered in 1600 CC category.

Three female participants are entering in Mahindra Adventure rally. The youngest competitor Harshita Gowda from Bengluru, is entering in 1600 CC category with Maruti Baleno.

Harshita has participated in 2 rounds of INRC in 2013 immediately after completing 18 years in September 2013. She is a second year Hotel Management student.

There is one more all ladies team, Garima Avatar and Sukhbans Mann. They are also entering for the first time in Indian Rally Championship.

The ladies pair will compete in the same category of 1600 CC with Harshita Gauda. Nashikites will have fun to watch the fairer sex battling each other. For more updates follow WISA on Twitter and www.wisa.org.in , it is informed in a release.

**Punyanagari 9th June**

# विसा रॅलीत फक्त २० स्पर्धकांची नोंदणी



नाशिक, दि. ८ (प्रतिनिधी)- या आठवड्याच्या अखेरपर्यंत नाशिक, सिन्नर, भंडारदऱ्यांच्या रस्त्यांवर थरार घडविणाऱ्या विसा महिंद्रा अॅडव्हेंचर रॅलीसाठी मुदत संपेपर्यंत केवळ २० स्पर्धकानीच प्रवेश नोंदविला आहे. यावर्षीचे वैशिष्ट्य असे की, यावेळी प्रथमच दोन महिला संघ स्पर्धेत सहभागी होत आहे.

महिंद्रा अॅडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रमध्ये सहभागी होण्याची पाच जून शेवटची तारीख होती; मात्र तोपर्यंत केवळ २० स्पर्धकांनीच प्रवेश घेतल्याने यावर्षीची स्पर्धा चुरशीची होईल की नाही, याविषयी संयोजकांनाच साशंकता वाटते आहे. दक्षिणेकडील स्पर्धांमध्ये ३५ ते ४० गाड्या सहभागी होतात; मात्र यावेळी महासंघाचे नियमही बदलल्याचेही कारण कमी प्रवेश आल्याचे असू शकते.

## प्रथमच दोन महिला संघ सहभागी

महिंद्राच्या या राज्यातील एकमेव फेरीत ५ जोड्या राज्यातीलच आहेत. काही वर्षांपूर्वी दक्षिणेकडचे वर्चस्व बदलण्यास सुरुवात झाली आहे. खुद्द नाशिकमधूनच पराग धिवर आणि आदित्य धिवर ही नाशिकची जोडी सहभागी झाली आहे. आदित्य नाशिकचा आहे, तर पराग यापूर्वी मलेशिया, बँकॉकमध्ये काही स्पर्धांमध्ये सहभागी झाला आहे. आदित्यची मात्र ही पहिलीच रॅली आहे.

या वर्षापासूनच भारतीय मोटार स्पोर्टसमध्ये स्त्रीशक्तीचा उदय झाल्याचे दिसून येत आहे. तीन महिला स्पर्धक महिंद्रा रॅली ऑफ महाराष्ट्रमध्ये सहभागी होत आहे. वयाने सर्वात लहान असलेली हर्षिता गौड बंगलोरची आहे. मागच्या वर्षी १८ वर्ष पूर्ण झाल्याबरोबरच ती दोन राऊंडमध्ये सहभागी झाली. मारुती बलेनो १६००सीसी कॅटेगरीमध्ये ती यंदा दिसेल. ती म्हणते, मी पहिल्यांदाच डांबरी रस्त्यावर रॅलीमध्ये गाडी चालवणार आहे. या प्रकारचा मला अनुभव नसला, तरी चांगल्या कामगिरीचा विश्वास वाटतो आहे. हर्षिता हॉटेल मॅनेजमेंटच्या दुसऱ्या वर्षात शिकते आहे. नाशिकमध्ये तिच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याशिवाय गरिमा अवतार आणि सुखबंस मान पहिल्यांदाच आयआरसीमध्ये सहभागी होत आहे. त्या हर्षिताबरोबरच १६०० सीसीमध्ये सहभागी होत आहे. या कॅटेगरीत महिलांची चढाओढ बघायला मिळणार आहे.

**Maharashtra Times 9th June**

# महेंद्र ॲडव्हेंचर रॅलीमध्ये २० संघ सहभागी

## प्रथमच दोन महिला संघांचा सहभाग

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

'महेंद्र ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्र'मध्ये संपूर्ण भारतातून २० स्पर्धक संघांनी नोंदणी केली असून त्यात दोन महिला संघांचा समावेश आहे.

या रॅलीमध्ये पाच संघ महाराष्ट्रातून सहभागी होणार आहेत. काही वर्षांपूर्वी या स्पर्धेवर दक्षिणेकडील राज्यांचे वर्चस्व होते, परंतु हे चित्र बदलत आहे. नाशिकमधूनही एक संघ सहभागी झाला आहे. पराग धिवर आणि आदित्य धिवर असे दोघे भाऊ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. पराग यापूर्वी मलेशिया आणि बँकॉक येथील काही स्पर्धांमध्ये सहभागी झाला होता. मात्र आदित्यची ही पहिलीच स्पर्धा आहे. या वर्षीपासून महिला संघांनी सहभाग घेण्यास सुरुवात केली असून वयाने सर्वात लहान असलेली बंगळुरूची हर्षिता गौडा यात सहभागी होणार आहे. मागील वर्षी १८ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर आयएनआरसीच्या दुसऱ्या राउंडमध्ये ती सहभागी झाली होती. यावर्षी मारुती बलेरो गाडी घेऊन १६०० सीसी कॅटेगरीमध्ये ती असेल.

दुसरी टीम गरिमा अवतार आणि सुखबन्स मान पहिल्यांदाच आयआरसीमध्ये सहभागी होत आहेत. हर्शिताबरोबरच १६०० सीसी कॅटेगरीमध्ये यांची जोडी उतरत आहे. त्यामुळे १२ जूनपासून नाशिककरांना विसा रॅलीचा थरार अनुभवता येणार आहे.

**Lokmat 9th June**

# कार रॅलीत नाशिकचे धीवर बंधू

## कार रॅली पाहता-पाहताच जडला छंद

नरेश हाळणोर • नाशिक

भंडारदऱ्याच्या डोंगररांगांतील अवघड घाटवळणाच्या रस्त्यावरच्या कार रॅलीमध्ये नाशिकचे धीवर बंधू पहिल्यांदाच सहभागी होत असून, आपल्या गावातल्या स्पर्धेमध्ये सहभागी होतानाचा आनंद तर आहेच पण तेवढाच थरार अन् रोमांचही असल्याचे आदित्य सांगतो. कधी तरी कार रॅली पाहता-पाहता जडलेला हा छंद आता पॅशन झाल्याचे त्याने सांगितले.

वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने व विसाच्या सहकार्याने इंडियन रॅली चॅम्पियनशिपच्या महिंद्र ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रच्या पहिल्या फेरीला येत्या गुरुवारी प्रारंभ होत आहे. आत्तापर्यंतच्या सदरील स्पर्धेतून पहिल्यांदा स्थानिक स्पर्धक सहभागी होत असून तेही आदित्य व पराग या धीवर बंधूंच्या रुपाने. आदित्यचा नाशिकमध्ये इव्हेंट मॅनेजमेंटचा व्यवसाय आहे, तर पराग मुंबईला स्थायिक झाला असून, तो फक्त आणि फक्त कार रॅलीत सहभागी होत असतो. परागने गेल्या वर्षीची मलेशिया कार रॅली जिंकली असून तो चॅम्पियन आहे आणि आता त्याचे लक्ष्य इंडियन कार रॅलीवर असून, त्या उद्देशानेच तो महिंद्र ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रच्या पहिल्या फेरीत सहभागी होत आहे. परागच्याच रॅली पाहून आदित्यलाही कार रॅलीचा छंद जडला आणि आता तो त्यातही चांगलाच पारंगत झाला आहे. त्याने कोची येथे राजहा आयलँडवर आयएमसी रॅलीत तिसरे स्थान पटकावले होते. या स्पर्धेची नोंद लिमका बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे हे विशेष.

भंडारदऱ्याच्या दऱ्याखोऱ्यातील अवघड वळणावरची स्पर्धा कठीण असली तरी गौरव गिल, सिद्धू, अमरजित यांसारख्या दिग्गज स्पर्धकांशी दोन हात करण्याची संधी मिळत असल्याचा विशेष आनंद आदित्य व्यक्त करतो. स्पर्धेत तो परागचा नेव्हीगेटर असणार असून, अखेरच्या एखादं-दोन राऊंडमध्ये तो स्वत: ड्राईव्हही करण्याच्या तयारीत आहे. सध्या निफाड परिसरातील रस्त्यावर त्यांचा रोजचा सराव जोरात सुरु आहे. आयआरसी स्पर्धेतून सहभागी होणारे धीवर बंधू हे पहिलेच नाशिककर आहेत.



"इंडियन रॅलीमध्ये उतरण्याची पहिलीच वेळ. कोचीची स्पर्धा केली. परागबरोबर अनेक स्पर्धा पाहिल्या. तेव्हापासूनच आवड लागली. नाशिकच्या स्पर्धेत उतरताना आनंदच होतो आहे. पण त्याहीपेक्षा नाशिकमधून कोणीतरी या स्पर्धेत आहे याचा विशेष आनंद आहे.

- आदित्य धीवर.

**Lokmat 9th June**

# महिंद्र ॲडव्हेंचर कार रॅलीत पहिल्यांदाच 'तिघी'

नाशिक : येत्या गुरुवारपासून इंडियन रॅली चॅम्पियनशिपच्या पहिल्या फेरीला प्रारंभ होणार असून, स्पर्धेसाठी आत्तापर्यंत देशभरातून २० स्पर्धेकांनी सहभाग घेतला आहे. विशेषत: यात पहिल्यांदाच तीन महिलाही सहभागी होत असल्याने या स्पर्धेचे हे एक वेगळेपण ठरणार आहे.

वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने व विसाच्या सहकार्याने येत्या गुरुवारपासून नाशिक शहर व सिन्नर-घोटी परिसरात इंडियन रॅली चॅम्पियनशिपच्या महिंद्र ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रच्या पहिल्या फेरीचा थरार रंगणार आहे. सदर स्पर्धेसाठी देशभरातून सुमारे २० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला असून, यात गतविजेता गौरव गिल, अमितरजित घोष, सनी सिद्धू, समीर थापर हे आघाडीचे स्पर्धक सहभागी झाले आहेत. येत्या शुक्रवारी फाळके स्मारकामध्ये रॅलीचा थरार नाशिककरांना अनुभवता येणार असून, १४ व १५ तारखेला सिन्नर-घोटी परिसरातील भंडारदऱ्याच्या डोंगररांगांतील धोकादायक व अवघड वळणांच्या रस्त्यावर चॅम्पियनशिपच्या पहिल्या फेरीतील वेगाचा थरार रंगणार आहे.

## हर्षिता, गरिमा अन् सुखिबंसं

◆ महिंद्र ॲडव्हेंचर रॅलीमध्ये बंगळुरूची हर्षिता गौडा ही गेल्यावर्षीही सहभागी झाली होती. यावेळी ती पुन्हा सहभागी होत असून, आणखी दोघी पहिल्यांदाच सहभागी होत आहे. गरिमा अवतार आणि सुखिबंस मान या दोघी पहिल्यांदाच मोटार स्पोर्ट्समध्ये सहभागी होत आहेत. हर्षिता १६00 सीसी गटात सहभागी होत असून, स्पर्धेतील सर्वात लहान वयातील ती आहे.

**Deshdoot Times 8th June**

# Mahindra Adventure Rally of Maharashtra gets 20 entries

NASHIK : Last date to register as competitor for Mahindra Adventure Rally of Maharashtra was Friday, June 5. Till date, only 20 competitors have entered in the event. While rounds in Southern parts witness grid of 35 - 40 cars, country's Best Organized event gets only half of it. Changes in FMSCI Regulations may also be reason behind less no. of entries, informed West India Sports Association (WISA) yesterday.

The silver lining to the motorsports scene in Maharashtra is there are 5 competitors from Maharashtra in Mahindra Adventure Rally of Maharashtra. One is from WISA's own city, Nashik. A cousin duo, Parag and Aditya Dhiwar, has entered in 1600 cc category. Aditya is from Nashik. While Parag has previously entered in Malaysian and Bangkok motorsports events, Aditya is a novice. First time he has decided to enter in his Home town. Definitely all Nashikites will support him and cheer for him.

2014 also witnesses Woman Empowerment in Indian Rally Championship scene in the country. 3 females are entering in Mahindra Adventure Rally. The youngest competitor Harshita Gowda from Bengaluru, is entering in 1600 CC category with a Maruti Baleno.

When WISA officials contacted her and enquired about her preparations, she was very much confident. As Nashik rally is the only tarmac event, she said, "My Tuner is making special arrangements for tarmac route. I am not conversant with these type of routes. Only driven once in last year SSS at Coimbtore event. But I am sure to clock good timing."

Harshita has participated in 2 rounds of INRC in 2013 immediately after becoming 18 in September. She is second year Hotel Management student. Presently very busy in training. Let us see her performance in Nashik. Her co-driver is more experience than her. He has entered in few events before.

There is one more all ladies team, GarimaAwatar and Sukhbans Mann. They are also entering for the first time in IRC. The ladies pair will compete in the same category of 1600 CC with Harshita. Nashikites will have fun watching the fairer sex competitors battling each other.